# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.11.2024** **वारःशुक्रवार**

---

१.देशातील आदिवासींचा विकास झाला तरच खऱ्या अर्थानं देशाचा विकास होईल- भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जन्मशताब्दी निमित्त राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
२.देशासह जगभरात आज गुरु नानक जयंती निमित्त उत्साहाचं वातावरण.
३.महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या झंजावाती प्रचार सभा
४.महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत भारताचा थायलंडवर १३-० असा दणदणीत विजय.
आणि
५.भारत आणि दक्षिण आफ्रिकेतील टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला शेवटचा सामना आज

**राष्ट्रपती**

देशातील आदिवासींचा विकास झाला तरच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल असं प्रतिपादन राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल केलं. आज साजऱ्या होत असलेल्या जनजाति गौरव दिवसाच्या पार्श्वभूमीवर देशाला संबोधित करताना त्या काल बोलत होत्या. जनजाती समुदायातील नागरिकांचा विकास जलद गतीने होणं ही राष्ट्रीय स्तरावरील प्राथमिकता आहे. गेल्या अनेक दशकांपासून असलेली त्यांची अस्मिता कायम राखत आधुनिक विकासाच्या प्रवाहातही त्यांनी मार्गक्रमण करावं. यासाठी राष्ट्रीय स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या वर्षी जनजाती गौरव दिवसा निमित्त आयोजित कार्यक्रमांत सुरू केलेल्या पीएम-जनमन अभियानाचे उद्दिष्ट विशेषत: असुरक्षित आदिवासी समुदायाचा, सर्वसमावेशक विकास घडवून आणण्याचे आहे. या मोहिमेअंतर्गत 24 हजार कोटींहून अधिक खर्चाच्या विविध योजना राबवून ३ वर्षांच्या कालमर्यादेत अनेक सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. अशी माहिती राष्ट्रपतींनी दिली. भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त देशभरांत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे.
या उत्सवाची सुरूवात करत असल्याची घोषणा त्यांनी केली. तसंच सर्व नागरिकांच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या पवित्र स्मृतीस आदरांजली वाहिली.

**PM-JANJATIYA**

जनजाती गौरव दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमधील जमुई इथं आज भेट देणार आहेत. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते होईल. यावेळी पंतप्रधान भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मरणार्थ एका नाण्याचं आणि टपाल तिकिटाचं अनावरण करणार आहेत. ग्रामीण

आणि दुर्गम भागातील आदिवासी समुदायांच्या विकासासाठी 6 हजार 640 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**<u>बोडोलँड</u>**

पहिल्या बोडोलँड महोत्सवाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत  उद्घाटन होणार आहे. केवळ बोडोलँडमध्येच नाही तर आसाम, पश्चिम बंगाल, नेपाळ आणि ईशान्येकडील सीमावर्ती भागात राहणाऱ्या स्थानिक बोडो लोकांना एकत्रित करणं हे या महोत्सवाचं उद्दिष्ट  आहे. समृध्द भारतासाठी शांतता आणि एकता अशी या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**<u>गुरुनानकजयंती</u>**

गुरु नानक देवजींची ५५५ वी जयंती अर्थात प्रकाश पर्व आज संपूर्ण देशासह जगभरात उत्साहात साजरी करण्यात  येत आहे. ज्यांनी शीख धर्माची  स्थापना  केली ते पहिले शीख गुरू, गुरु नानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त हा  उत्सव  साजरा  केला  जातो. यानिमित्त  गुरुद्वारांमध्ये  भजन, कीर्तन कार्यक्रमांचं आयोजन  करण्यात  आलं  आहे.

**<u>गुरुनानकजयंती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरु नानक यांच्या प्रकाश पर्वानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारत आणि परदेशात राहणाऱ्या सर्व भारतीयांना, विशेषत: शीख समुदायाला राष्ट्रपतींनी त्यांच्या संदेशात शुभेच्छा दिल्या. गुरु नानकजी  यांची  प्रेम, विश्वास, सत्य आणि त्यागाची  शिकवण सर्वांना नैतिकतेबद्दल मार्गदर्शन करते, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती  जगदीप धनखड यांनीही गुरु नानक यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या  आहेत.

गुरु नानक यांच्या जीवन चरित्रातून  समानता, करुणा आणि मानवतेच्या सेवेविषयी  प्रेरणा  मिळते  असं उपराष्ट्रपतीनी आपल्या संदेशात म्हटलं  आहे.

**<u>प्रचार</u>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. सर्वच पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या झंजावाती प्रचार दौऱ्यामुळे राज्यातलं वातावरण ढवळून निघालं आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल राज्यात तीन ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. काँग्रेस आणि महाविकास आघाडी सत्तेत आली तर आरक्षण हटवेल, असा आरोप मोदी यांनी काल मुंबईत शिवाजी पार्कवर घेतलेल्या सभेत केला.

शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यांच्यासह महायुतीचे इतर नेते यावेळी उपस्थित होते.

भाजप नेते, आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही काल धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं, सांगली जिल्ह्यात पलूस कडेगाव आणि कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी इथं महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

विकसित महाराष्ट्रासाठी महायुती सरकार राज्यात पुन्हा आलं पाहिजे, असं प्रतिपादन गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. यावेळी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली; आणि विरोधकांवर जोरदार टीकाही केली.

कॉँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनीही राज्यात प्रचार सभा घेतल्या. महाराष्ट्रात सत्तेत आल्यास शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचे कर्ज माफ केलं जाईल," अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली. नांदेड आणि नंदुरबार इथं महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते.

सत्ताधारी विकासाचे मुद्दे न देता केवळ कॉँग्रेस आणि गांधी घराण्यावर टीका करत आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडी सरकारच्या हातात राज्य दिल्यास आम्ही विकासाला गती देऊ, असं आश्वासन मल्लिकार्जुन खरगे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिलं.

खर्गे यांनी काल इगतपुरी इथंही प्रचार सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीनं महाराष्ट्राच्या लोकांना खोटी आश्वासनं दिल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला, आणि महायुतीच्या सरकारवर टीका केली.

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघातील सांगवी इथं प्रचार फेरी घेतली. तर पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काल नवी मुंबईत प्रचार सभा घेतळी.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं तसंच अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे इथं जाहीर सभा घेतल्या. तर पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी काल दापोली इथं सभा घेतली.
मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातल्या खडकवासला मतदारसंघात काल सभा घेतली.

**<u>झारखंड</u>**

झारखंडमधील विधानसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचारालाही वेग आला आहे. गिरीडीह, बोकारो आणि गांडे इथं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी तर दुमका इथं झारखंड मुक्ती मोर्चाचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी काल प्रचारसभांना संबोधित केलं

**दिल्ली**

दिल्लीतील वाढत्या प्रदुषणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व प्राथमिक शाळा पुढील निर्देशापर्यंत ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवाव्यात असे निर्देश मुख्यमंत्री आतिशी यांनी समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे दिले आहेत. वायु प्रदुषण गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाकडून प्रदुषणासंदर्भात सतर्कतेची घोषणा झाल्यानंतर हे निर्देश देण्यात आले आहेत. प्रदुषण नियंत्रणासाठी तिसऱ्या स्तरावरील उपाययोजना आज सकाळपासून राबवण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**निर्यातवृद्धी**

एप्रिल ते ऑक्टोबर 2024 या कालावधीत भारताच्या निर्यातीत 7 पूर्णांक 28 टक्क्यांनी वाढ झाली असून 468 बिलियन डॉलर्सपेक्षा जास्त निर्यात झाली आहे, 2023 मध्ये याच कालावधीत भारताची निर्यात 436 बिलियन डॉलर्स इतकी होती. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, व्यापारी मालाची निर्यात 252 बिलियन डॉलर्सवर पोहोचली आहे, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील २४४ बिलियन डॉलर्स इतकी होती.तर एप्रिल-ऑक्टोबर 2024 दरम्यान सेवा क्षेत्रातील निर्यातीचे अंदाजे मूल्य 215 बिलियन डॉलर्स इतकं नोंदवण्यात आलं असून जे मागील वर्षातील 191 बिलियन डॉलर्स इतकं होतं.

**गोवाइफफी**

गोव्यातल्या 55व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी अर्थात इफफीसाठी
प्रसारमाध्यमांच्या मोठ्या संख्येने आलेल्या विनंत्या लक्षात घेऊन,माध्यम प्रतिनिधींसाठी नोंदणीची सुविधा काल संध्याकाळी पुन्हा सुरू करण्यात आली. प्रसारमाध्यमांना आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत नावनोंदणी करता येईल.

**नेमबाजी**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पाचवी राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धा सुरू आहेत. काल दुसऱ्या दिवसाखेर १० मीटर एअर पिस्टल एच एस १ महिला गटाच्या अंतिम सामन्यात दिल्लीच्या भक्ती शर्मा हिने सुवर्ण पदक पटकावले; तर राजस्थानच्या श्रृष्ठी असोरानं रौप्य पदक पटकावला. पॅरिस पॅरालिंपिकमध्ये कास्य पदक मिळवणारी मध्य प्रदेशची रूबिना फ्रान्सिस सातव्या क्रमांकावर फेकली गेली. १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स एच एस १ गटात राजस्थानच्या मोना अग्रवाल हिने सुवर्ण कामगिरी केली; तर महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकर याने रौप्य पदक पटकावले.

**क्रीडा**

बिहारमधे सुरु असलेल्या, महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत काल भारतानं थायलंडवर १३-० असा विजय मिळवला. भारतातर्फे दिपीकानं चमकदार कामगिरी करत ५ गोल नोंदवले. या स्पर्धेतला भारताचा हा सलग तिसरा विजय आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेतील टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला शेवटचा सामना आज संध्याकाळी जोहान्सबर्गच्या वांडरर्स मैदानावार खेळला जाणार आहे. चार सामन्यांच्या मालिकेत भारत २-१ नं आघाडीवर आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडे आठ वाजता हा सामना सुरू होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.